॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २४ जुलै : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संशोधन विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या पेट (PET)-2026 परीक्षेचे अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, आज दि. २४ जुलै पासून ऑनलाइन अर्ज प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. पीएच.डी. प्रवेशासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना निर्धारित कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

विद्यापीठातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया २४ जुलै २०२६ पासून सुरू झाली असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २४ ऑगस्ट २०२६ आहे. त्यानंतर अर्जांची छाननी करून १७ सप्टेंबर २०२६ रोजी उमेदवारांना हॉल तिकीट (प्रवेशपत्र) ऑनलाइन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

पेट-2026 प्रवेश परीक्षा २३ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्जाची हार्ड कॉपी १६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत संबंधित विभागाकडे सादर करणे आवश्यक राहणार आहे.

पेट परीक्षेतून सूटकरिता देखील विद्यापीठाच्या वेबसाइट वर सविस्तर माहिती व वेळापत्रक देण्यात आले आहे

विद्यापीठाने स्पष्ट केले आहे की, PET-2026 साठीचे सर्व अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारले जाणार आहेत. उमेदवारांनी अर्ज भरताना सर्व माहिती अचूकपणे भरावी तसेच आवश्यक कागदपत्रे नियमानुसार अपलोड करावीत.

तसेच हॉल तिकीट उमेदवारांच्या लॉगइनमध्ये उपलब्ध करून दिले जाणार आहे.

पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी पेट (PET) ही अनिवार्य प्रवेश परीक्षा असल्याने इच्छुक उमेदवारांनी अंतिम तारखेची वाट न पाहता वेळेत ऑनलाइन अर्ज भरावेत, असे आवाहन विद्यापीठाच्या संशोधन विभागामार्फत करण्यात आले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २४ जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता